**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :- आरटीई २०१३/प्र.क्र.९१/१३ प्राशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०१३

प्रति,
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद
पुणे.

**विषय :- महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परिक्षा २०१३ चे आयोजन**

संदर्भ :-१. आपले पत्र क्र.मरापप/बापवि/२०१३/६२७३, दि.२८/०८/२०१३
२. आपले पत्र क्र.मरापप/बापवि/२०१३/६६४४, दि.११/०९/२०१३
३. आपले पत्र क्र.मरापप/बापवि/२०१३/६७२७, दि.१३/०९/२०१३
४. राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ-७६-१/२०११/एनसीटीई/एसीएडी, दिनांक ९ एप्रिल, २०१३
५. आपले पत्र क्र.मरापप/बापवि/२०१३/७३५२, दि.४/१०/२०१३
६. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्र. मराशैसंप्रप/राशिप्रमं/शिपाप/३३२०/२०१३-१४, दिनांक ८/१०/२०१३

महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परिक्षा २०१३ आयोजनाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन मराठी, उर्दू आणि इंग्रजी या माध्यमातून करण्यात यावे.

२) दोन्ही पेपरमधील (१ व २) भाषा या विषयासाठी खालीलप्रमाणे Language-I व Language-II राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| भाषा-१ | मराठी | इंग्रजी | उर्दू |
| भाषा-२ | इंग्रजी | मराठी | मराठी किंवा इंग्रजी |

३) मराठी, उर्दू आणि इंग्रजी वगळता इतर माध्यमाच्या परिक्षार्थींना मराठी अथवा इंग्रजी यापैकी एका माध्यमातून परिक्षा देण्याचा पर्याय राहील.

४) या परिक्षेसाठी मान्य केलेला अभ्यासक्रम परिशिष्ट-अ प्रमाणे सोबत जोडला आहे.

५) परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात यावे.



Scanned with CamScanner

| प्रवर्ग | फक्त पेपर -१ किंवा पेपर-२ | पेपर-१ व पेपर-२ |
|---|---|---|
| सर्वसाधारण, इ.मा.व., वि.मा.प्र. व वि.जा.भ.ज. | रू.५००/- | रू.८००/- |
| अनु.जाती, अनु.जमाती व अपंग (Differently abled perscn) | रू.२५०/- | रू.४००/- |

६) परिक्षेचे आयोजन दिनांक १५ डिसेंबर, २०१३ रोजी करण्यात यावे.

७) या परिक्षा आयोजनास व्यापक प्रसिध्दी दयावी.

(सतिश जोंधळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :

१. संचालक (प्राथमिक/माध्यमिक/SCERT)
२. मा.राज्यमंत्री/मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक.



Scanned with CamScanner

## परिशिष्ट - अ

### शिक्षक पात्रता परीक्षा पाठयक्रम ( Syllabus ) व प्रश्नपत्रिका आराखडा

संदर्भ :- शासन निर्णय क्र.आरटीई २०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२ दिनांक २३ ऑगस्ट २०१३

**प्रश्नपत्रिका आराखडा :-**

शिक्षक पात्रता परीक्षा ही दोन स्तरावर घेतली जाणार आहे.

- प्राथमिक स्तर [पेपर एक I] इ.१ली ते इ.५वी वर्गासाठी अध्यापन करु इच्छिणा-या शिक्षकांसाठी
- उच्च प्राथमिक स्तर [पेपर- दोन II] इ.६वी ते इ.८वी या वर्गासाठी अध्यापन करु इच्छिणा-या शिक्षकांसाठी
- **प्राथमिक व उच्च प्राथमिक या दोन्ही स्तरावर अध्यापन करु इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी दोन्ही पेपर अनिवार्य असतील .**

पेपर (१) प्रश्नपत्रिका आराखडा व प्रश्नाचे स्वरुप

एकूण गुण १५० | कालावधी - २ तास ३० मिनिटे

| अ.क्र. | विषय (सर्व विषय अनिवार्य) | गुण | प्रश्न संख्या | प्रश्न स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | बाल मानसशास्त्र व अध्यापन शास्त्र | ३० | ३० | बहुपर्यायी |
| २ | भाषा - १ | ३० | ३० | बहुपर्यायी |
| ३ | भाषा - २ | ३० | ३० | बहुपर्यायी |
| ४ | गणित | ३० | ३० | बहुपर्यायी |
| ५ | परिसर अभ्यास | ३० | ३० | बहुपर्यायी |
| | एकूण | १५० | १५० | १५० बहुपर्यायी प्रश्न |

पाठयक्रमाची ( Syllabus ) व्याप्ती

**१) बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र :-**

या विषयाच्या अनुषंगाने विचारण्यात येणारे प्रश्न हे शैक्षणिक मानसशास्त्र यासंबंधी व ६ ते ११ वर्षे वयोगटाच्या विदयार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसंबंधी असतील. याच बरोबर विशेष गरजा असणारी बालके, त्यांची गुणवैशिष्टये, शालेय आंतरक्रिया, उत्तम शिक्षकाची गुणवैशिष्टये यांच्यावर आधारीत प्रश्नांचाही समावेश असेल. तसेच विविध विषयांच्या अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती यावर आधारीत प्रश्नांचा समावेश राहील .

या विषयासाठी अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमावर आधारीत विहित सध्या राज्यात सुरु असलेला पाठयक्रम लागू राहील.

**२) भाषा - १ व भाषा - २**

या परिक्षेसाठी खालील गटाप्रमाणे भाषा-१ व भाषा-२ विषय घेता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| भाषा-१ | मराठी | इंग्रजी | उर्दू |
| भाषा-२ | इंग्रजी | मराठी | मराठी किंवा इंग्रजी |

इ.१ली ते ५ वी प्रचलित असलेला अभ्यासक्रमातील पाठयक्रम राहील.



Scanned with CamScanner

३) गणित :-

गणित विषयाशी संबंधित प्रश्न हे गणितातील मूलभूत संबोध, तार्किकता, समस्या निराकरण व गणित विषयाचे अध्यापनशास्त्रीय ज्ञान या मुद्दयांवर आधारीत असतील.

गणित विषयाची व्याप्ती इ.१ली ते इ.५वी च्या प्रचलित अभ्यासक्रमावरील असेल.

४) परिसर अभ्यास :-

परिसर अभ्यास विषयाशी संबंधित प्रश्न हे इतिहास, नागरीक शास्त्र , भूगोल, सामान्य विज्ञान, पर्यावरण या विषयातील मूलभूत संबोध व या विषयाचे अध्यापनशास्त्रीय ज्ञान या मुद्दयांवर आधारीत असतील.

परिसर अभ्यासाची व्याप्ती इ.१ली ते इ.५वी च्या प्रचलित अभ्यासक्रमानुसार असतील. मात्र पुनर्रचित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२ मध्ये इ.१ली व इ.२री ला स्वतंत्रपणे परिसर अभ्यास हा विषय नाही. परिसर अभ्यास हा विषय प्रथम भाषा व गणित या विषयामध्ये एकात्मिक पध्दतीने समाविष्ट केलेला आहे. इ.३री ते इ.५वी चा प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ मधील इतिहास, नागरीक शास्त्र , भूगोल, सामान्य विज्ञान या विषयांचा पाठयक्रम लागू राहील.

काठिण्य पातळी :- वरील सर्व विषयांच्या इयत्ता १ ली ते ५ वी चे अभ्यासक्रमातील घटकावर, माध्यमिक शालांत परिक्षेच्या काठिण्य पातळीचे प्रश्न असतील.

संदर्भ :-

- प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम व पाठयक्रम
- प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व पाठयक्रम
- संबंधित विषयांची राज्य शासनाची विहित केलेली प्रचलित इ. १ ली ते १० वी ची पाठयपुस्तके



Scanned with CamScanner

## पेपर (२) प्रश्नपत्रिका आराखडा व प्रश्नाचे स्वरुप
## (इ.६ वी ते ८ वी - उच्च प्राथमिक स्तर)

गुण - १५०  कालावधी - २ तास ३० मिनिटे

| पेपर II | विषय | गुण | प्रश्न संख्या | प्रश्न स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | बालमानसशास्त्र व अध्यापन शास्त्र | ३० | ३० | बहुपर्यायी |
| २ | भाषा - १ | ३० | ३० | बहुपर्यायी |
| ३ | भाषा - २ | ३० | ३० | बहुपर्यायी |
| ४ | अ) गणित व विज्ञान<br>किंवा<br>ब) सामाजिक शास्त्रे (Social Studies) | ६० | ६० | बहुपर्यायी |
| | एकूण | १५० | १५० | १५० बहुपर्यायी प्रश्न |

पेपर II मधील अ.क्र.१ ते ३ विषय अनिवार्य आहेत. गणित व विज्ञान शिक्षकांसाठी विषय ४ मधील "अ" आणि सामाजिक शास्त्र शिक्षकांसाठी विषय ४ मधील "ब" व इतर शिक्षकांसाठी विषय क्र. ४ मधील "अ" किंवा "ब" पैकी कोणताही एक विषय निवडता येईल.

पाठयक्रमाची (Syllabus) व्याप्ती :-

१) बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र :-

या विषयाच्या अनुषंगाने विचारण्यात येणारे प्रश्न हे शैक्षणिक मानसशास्त्र यासंबंधी व ११ ते १४ वर्ष वयोगटाच्या विदयार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसंबंधी असतील. याच बरोबर विशेष गरजा असणारी बालके, त्यांची गुणवैशिष्टये, शालेय आंतरक्रिया, उत्तम शिक्षकाची गुणवैशिष्टये यांच्यावर आधारीत प्रश्नांचाही समावेश असेल. तसेच विविध विषयांच्या अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती यावर आधारीत प्रश्नांचा समावेश राहील .

या विषयासाठी प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व ११ ते १४ वयोगटाशी संबंधित प्रचलित बी.एड्. अभ्यासक्रमातील भाग या अभ्यासक्रमावर आधारीत विहित केलेला व सध्या राज्यात सुरु असलेला पाठयक्रम लागू राहील.

<u>(२) भाषा - १</u> तसेच <u>(३) भाषा - २</u>

या परिक्षेसाठी खालील गटाप्रमाणे भाषा-१ व भाषा-२ विषय घेता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| भाषा-१ | मराठी | इंग्रजी | उर्दू |
| भाषा-२ | इंग्रजी | मराठी | मराठी किंवा इंग्रजी |

इ.६ वी ते ८ वी प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामधील संबंधित भाषेचा पाठयक्रम लागू राहील.

४ अ) गणित व विज्ञान विषय गट -

गणित व विज्ञान विषय गटासाठी एकूण ६० गुण असून त्यापैकी ३० गुण गणितासाठी व ३० गुण विज्ञानासाठी राहतील. या विषय गटातील प्रश्न हे विज्ञान व गणितातील मूलभूत संबोध, समस्या निराकरण क्षमता, गणित व विज्ञानाचे अध्यापन शास्त्रीय ज्ञान या संबंधीचे असतील.



Scanned with CamScanner

प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामधील संबंधित विषयाचा इयत्ता ६ वी ते ८ वी चा पाठ्यक्रम लागू राहील.

**४ ब) सामाजिक शास्त्रे विषय गट –**

सामाजिक शास्त्रासाठी एकूण ६० गुणांचे ६० प्रश्न असतील. सदर प्रश्न हे सामाजिक शास्त्रातील संकल्पना, आशय व अध्यापनशास्त्रीय ज्ञानासंबंधी असतील.

प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम इ.६वी ते इ.८वी च्या अभ्यासक्रमावर मधील संबंधित विषयाचा पाठ्यक्रम लागू राहील.

**काठिण्य पातळी :-** वरील सर्व विषयांच्या इयत्ता ६ वी ते ८ वी चे अभ्यासक्रमातील घटकावर, उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या काठिण्य पातळीचे प्रश्न असतील

संदर्भ :-

- प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम इ. ६ वी ते ८ वी व पाठयक्रम
- प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व पाठयक्रम
- प्रचलित संबंधित विषयांची राज्य शासनाने विहित केलेली प्रचलित इ. १ ली वी ते १२ वी ची पाठयपुस्तके
- प्रचलित बी.एड्. अभ्यासक्रम व पाठयक्रम



Scanned with CamScanner